# जनवादी साहित्यिक
# अण्णा भाऊ साठे



संपादक
डॉ.पी.विठ्ठल डॉ.राजेश्वर दुडूकनाळे

Scanned by CamScanner

**जनवादी साहित्यिक : अण्णा भाऊ साठे**

संपादक : डॉ. पी. विठ्ठल, डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

Janwadi Sahityik : Anna Bhau Sathe

Sampadak : Dr. P. Vitthal, Dr. Rajeshwar Duduknale

■

प्रथम आवृत्ती : १ ऑगस्ट, २०१७

■

ISBN 978-93-86401-11-3

■

© मा. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड–४३१ ६०६.

■

मुखपृष्ठ : शाम भालेकर

■

अक्षरजुळणी : डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

■

गुरुराज प्रिंटर्स, पुणे

■

प्रकाशक

डायमंड पब्लिकेशन्स

२६४/३ शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट

ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे–४११ ०३०

☎ ०२०–२४४५२३८७, २४४६६६४२

info@diamondbookspune.com

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी भेट द्या

www.diamondbookspune.com

■

मूल्य : २५०/-

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी- फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

# अनुक्रम


- भूमिका ९
- संपादकीय ११

१ अण्णा भाऊंचे चरित्र म्हणजे ज्वालामुखी आणि जलाशय यांचा समन्वय १७
डॉ. आ. ह. साळुंखे

२ साहित्यिक अण्णा भाऊ साठे ३३
डॉ. जनार्दन वाघमारे

३ अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य : पुनर्मूल्यांकनाच्या दिशा ४२
डॉ. रणधीर शिंदे

४ अण्णा भाऊ साठे यांची लोकनाट्ये ५६
डॉ. संदीप अ. बनसोडे

५ कादंबरीकार अण्णा भाऊ साठे ६६
डॉ. प्रमोद भीमराव गारोडे

६ अण्णा भाऊ साठे : भारतीय सांस्कृतिक क्रांतीचे ऊर्जास्रोत ८१
डॉ. दिलीप चव्हाण

७ जात, वर्गकलह आणि अण्णा भाऊ ९४
आरती गायकवाड

८ संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार अण्णा भाऊ साठे १०१
डॉ. मारोती द. कसाब

९ अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक तत्त्वज्ञान ११३
डॉ. विठ्ठल भंडारे

# ४

# अण्णा भाऊ साठे यांची लोकनाट्ये

■

डॉ. संदीप अ. बनसोडे

आपल्या देशाला १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले, हे जरी खरे असले तरी या स्वातंत्र्यासाठी अनेक देशभक्तांना आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागली. या स्वातंत्र्यासाठी प्रत्येक जण आपापल्या परीने आपल्या मायभूमीला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तत्पर होता. १९४२ ला म. गांधींनी 'चलेजाव'ची चळवळ हाती घेतली आणि देशातील तरुणांना एक प्रकारची देशासाठी काहीतरी करण्याची ऊर्मी प्राप्त झाली. जणूकाही ही तरुणाई याच दिवसाची वाट पाहत होती.

या तरुणांमध्ये एक तरुण असाही होता जो अंगकाठीने भलेही कमजोर दिसत असला तरी एकदा हाती लेखणी आली म्हणजे लिखाणाच्या जोरावर एखादी क्रांती सहज हस्तगत करण्याचा जोम त्याच्या अंगी संचारायचा. असा हा तरुण होता अण्णा भाऊ साठे. जे बालपणी तुकाराम भाऊ साठे होते त्यांनी स्वत:ची ओळख निर्माण केली आणि एक कोणालाही न घाबरणारा संघर्षशील लढवय्या लेखक म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला.

त्या वेळी देशांतर्गत अनेक प्रश्नांनी देश ढवळून निघत असताना भाषावार प्रांतरचनेचा प्रश्नही अत्यंत महत्त्वाचा असल्याने जटिल बनत चालला होता. नेमके या वेळी मोरारजीभाई देसाई यांचे नेतृत्व गुजरातच्या बाजूने उभे राहिले आणि आज देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाणारी मुंबई ही महाराष्ट्रापासून तोडून गुजरात राज्याला जोडण्यासाठीचे सर्व प्रकारचे राजकारण केले गेले. मात्र, अण्णा भाऊंनी सर्व शक्तीनिशी या अन्यायविरुद्ध दंड थोपटत शाहीर अमर शेख, शाहीर गवाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाच्या माध्यमातून उभा महाराष्ट्र पिंजत मुंबई ही महाराष्ट्राचं काळीज कसं आहे, हे पटवून दिले. अण्णांच्या या



Scanned by CamScanner

कलापथकासाठी वापरलेल्या संहितेचा फटका तत्कालीन महाराष्ट्र आणि मोरारजी देसाई यांना बसला. सुडाच्या भावनेने सत्तेचा गैरवापर करत त्यांनी पोलिसांचा ससेमिरा अण्णा भाऊंच्या मागे लावला. कलापथकाचा कार्यक्रम सादरीकरणाची बंदी शासनाने केली; पण तरीही भाऊ डगमगले नाहीत. त्यांनी लागलीच लोकनाट्याचा आधार घेत आपली प्रतिभा मायबाप रसिकांसमोर आणली. इतकेच नव्हे तर शासनाला आव्हान देत 'माझी मुंबई' हा कार्यक्रम साडेतीन ते चार लाख मराठी कामगारांसमोर सादर केला. त्या वेळी रसिकांना अभिवादन करून म्हणाले, ''रसिकहो, मायबाप सरकारने आपल्या तमाशाला बंदी घातली आहे. म्हणून आज आपल्याला तमाशा करता येणार नाही. तेव्हा आज आपण लोकनाट्य सादर करणार आहोत.'' भाऊंच्या या आवाहनानंतर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. अण्णांना तमाशा सादर करताना प्रत्यक्ष पकडायचे व अटक करायची, अशी स्वप्न पाहणाऱ्या पोलिसांचाही हिरमोड झाला.

लोककलेच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मावशी, गण, गवळण, कृष्ण, राधा, नर्तकी या सर्व बाबींना फाटा देत संघर्षाने भरलेले, विज्ञाननिष्ठ व परिवर्तनशील संहिता असलेले लोकनाट्य पाहून रसिक बेहद्द खुश झाले. सोबतच लोकसमूहाचा प्रश्न जनसमूहाला सुखावून गेला. चटकदार संवाद, विनोदी सोंगाड्या, सुसंगत ताल, लय, आशयघनता व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आधुनिकता या सर्वांचा भरणा असलेली संहिता असो की लावणी ही रसिकांना भुरळ तर घालतच होती. सोबतच अंतर्मनात विचारांचे काहूर मांडत होती; एक प्रकारे वादळ निर्माण करत होती. 'माझी मुंबई' या लोकनाट्याची बंदी १५ जाने. १९५० रोजी उठली व शासनाकडून कायदेशीर सादरीकरणाची परवानगी मिळाली.

यासंबंधी विचारवंत डॉ. बाबुराव गुरव म्हणतात, ''अण्णा भाऊंनी तमाशाचे केलेले परिष्कृतरूप म्हणजे लोकनाट्य होय. अण्णांनी तमाशा या कलाप्रकाराला लोककाळ, परिस्थिती या संदर्भानुसार नवे रूप दिले. म्हणूनच लोकनाट्य म्हणून ते सर्व परिचित झाले, सर्वप्रिय झाले. जुन्या तमाशाच्या परंपरागत लोककलेला लोकनाट्य ही अण्णा भाऊंनी दिलेली नवी परिमिती आहे.''

गुरव यांच्या मांडणीतून तर अण्णांची प्रगल्भता लक्षात येतेच; सोबतच समयसूचकतेचा त्यांनी केलेला वापर हा त्यांच्या प्रतिभेला एक वेगळीच झालर प्राप्त करताना दिसतो. कारण तमाशाचे लोकनाट्य असे रूपांतर करून विद्रोह करत अण्णांनी त्या वेळी लोकजागर केला नसता तर देशाच्या आर्थिक राजधानी असलेली आपली मुंबई ही आज गुजरात राज्याची झाली असती, हे नाकारून चालणार नाही. त्यामुळे मुंबईच्या राजधानीचा शिरपेच महाराष्ट्र राज्याच्या पगडीत रोवण्याचा मान अण्णा भाऊनामक शाहिराला द्यावाच लागेल.



Scanned by CamScanner

यासंबंधी वर्णन करताना डॉ. गंगाधर पानतावणे लिहितात, 'थिएटरात अडकून पडलेला तमाशा लोकनाट्य म्हणून मैदानात हजारो लाखो लोकांच्या समोर नव्या डौलाने आणला तो अण्णा भाऊ साठे यांनीच. म्हणूनच या सर्व विद्रोहाचे पाणी पेटविणाऱ्या विरांचा महाराष्ट्र शतशः ऋणी आहे.'

अण्णांचा हा विद्रोह स्वतःच्या जगण्यासाठीचा नव्हता; न तो स्वतःवरील झालेला अन्याय दूर करण्यासाठीचा होता. तो होता माणुसकीचा माणसाला जगण्या-जगविण्यसाठी बळ देणाऱ्या मुंबईनामक ऊर्जेचा. ही ऊर्जा जर कोणी काढून घेणार असेल तर वाट्टेल ते झाले तरी बेहत्तर; पण ही ऊर्जा काढून घेणाऱ्याला रोखण्याचा. आणि यात अण्णा भाऊ यशस्वी झाले ते त्यांच्या 'माझी मुंबई'च्या रूपाने.

यासंबंधी विवेचन करताना विटेकर हे विचारवंत लिहितात, 'अण्णा भाऊंनी आपल्या नव्या तमाशाला लोकनाट्य हे संयुक्तिक नावं दिले. हे लोकनाट्य चांद्यापासून ते बांद्यापर्यंत हजारों लोकांसमोर रंगभूमीवर उभे राहिले. लाखो लोकांनी ते पाहिले. सुशिक्षित, जमीनदार, मध्यमवर्गीय, आदिवासी, शेतकरी, कातकरी तसेच वकील, डॉक्टर, प्रोफेसर, संत, पुढारी या सर्वांनीच ते पाहिले, त्यांना ते आवडले. म्हणजेच महाराष्ट्रातील समग्र वर्ग या लोकनाट्याने ढवळून काढला. कारण, अण्णा भाऊंच्या तमाशात महाराष्ट्रीय माणसाच्या ह्रदयाला भिडणारे व त्यांच्या मनाची पकड घेणारे असे गुण खात्रीने होते.'

पूर्वी तमाशा म्हटले की, उच्चभ्रू सुशिक्षित लोकांच्या कपाळावर आठ्या निर्माण करणारा प्रकार होता. (या आठ्या केवळ लोकांना दाखविण्यापुरत्या मर्यादित होत्या; इतर वेळी सर्वांत जास्त हीच मंडळी तमाशाला गर्दी करायची, हा भाग वेगळा) कुलीन आणि घरंदाज स्त्रीच्या तर कानावर ढोलकी, तुणतुणे याचा आवाज पडणेही निषिद्ध मानले जात असे आणि याला कारण काय, तर तमाशा करणारे कलावंत हे मागासवर्गीय तसेच त्यात असलेले अश्लील संवाद. यामुळे तमाशा म्हणजे बहिष्कृत असलेली आणि शासनाने सूड उगवावा तसे कायद्याने या कलेला बंदी आणलेली. मात्र, आपल्या प्रतिभेच्या जोरावर तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर करून खऱ्या अर्थाने राष्ट्रीय प्रवाहातील जनजागृतीचे एक महत्त्वाचे साधन बनवले. म्हणूनच समीक्षक कृष्णदेव उपाध्याय हे अण्णांचे कौतुक करताना म्हणतात, ''लोकनाट्य की भूमिका जब साहित्यिक निकषपर आती है तब एक बात जरूर सामने आती है की, अण्णा भाऊ साठे जैसे प्रतिभाशाली कलावंतोने उसका स्वरूप बदलकर लोकनाट्य को सृजनसंबध तथा राष्ट्रीय प्रवाह मे जुडा दिया है।''

एकाच वेळी मनोरंजन, प्रबोधन आणि जागृती असा त्रिवेणी संगम साधणारा अण्णा भाऊ हा महाराष्ट्रातील एकमेव 'लोकनाट्यकार' आहे, मात्र आपल्या मराठी



Scanned by CamScanner

समीक्षकांनी त्यांना दिवाकरांसारखी 'नाट्यछटाकार' अशी उपाधी लावण्याची तसदी घेतली नाही ही बाब और आहे. खरे तर अण्णा भाऊंच्या लोकनाट्याचा प्रथम उद्देश समाजजागृती आणि असलाच तर दुसरा उद्देश हा मनोरंजनाचा होता, हे नक्की.

अण्णा भाऊंच्या काही लोकनाट्यांचा आपण ऊहापोह केल्यास लक्षात येते की, त्यांच्या बहुतांश लोकनाट्यांत सामाजिक बांधीलकी आणि राष्ट्रवादी भावना आहे. ती जशास तशी तेवत ठेवूनच त्यांनी आपल्या लोकनाट्याचे स्वरूप बनवले. या संबंधात डॉ. परांजपे लिहितात,

'अण्णा भाऊंच्या लोकनाट्याची संहिता ही समर्पक आकृतिबंधात बांधलेली असून, त्यासाठी अण्णांनी विषय व आशयही अनुरूप निवडले आहेत. सोबतच भाषाशैली आणि प्रभावी निवेदनाने संवादाला कलाटणी देणारे स्वरूप साधले असून, समाजप्रबोधनाचे ते वास्तवमूर्त रूप आहे.'

अण्णा भाऊंनी एकूण १५ लोकनाट्ये लिहिली असल्याचे म्हटले असले तरी आजघडीला मात्र त्यापैकी फक्त ११ लोकनाट्येच अभ्यासकांना उपलब्ध आहेत. ती कालानुक्रमे पाहिल्यास अशी आहेत : 'अकलेची गोष्ट'-१९४५, 'खापऱ्या चोर'-१९४६, 'दे. भ. घोटाळे'-१९४६, 'निवडणुकीत घोटाळे'-१९४६, 'शेटजीचं इलेक्शन'-१९४६, 'बेकायदेशीर'-१९४७, 'माझी मुंबई'-१९४८, 'मूक मिरवणूक'-१९४९, 'लोकमंत्राचा दौरा'-१९५२, 'पुढारी मिळाला'-१९५२, 'बिलंदर बुडवे'-१९५३, अण्णा भाऊंनी जी लोकनाट्ये लिहिली ती केवळ अगदी सहजासहजी नाही तर यासाठी त्यांना बापू साठे यांच्या तमाशा मंडळातील काम केल्याचा अनुभव येथे कामी आला. आणि मग त्यांनी लेखक, कलावंत, दिग्दर्शक व संयोजक अशा लोकनाट्याच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या.

अण्णा भाऊंच्या लोकनाट्याविषयी आपण थोडक्यात जाणून घेऊ.

## अकलेची गोष्ट

अण्णा भाऊंचे हे पहिले लोकनाट्य १९४६ साली रंगमंचावर सादर झाले. कार्ल मार्क्सच्या सिद्धांताला कुठलेही गालबोट न लागू देता रसिकांपर्यंत त्यांचे विचार पेरण्याचे कसब अण्णांनी येथे यशस्वीरीत्या पेलल्याचे दिसते.

## खापऱ्या चोर

१९४६ साली लिहिलेल्या या लोकनाट्याच्या लेखनाची पार्श्वभूमी म्हणजे ग्रामीण जमीनदार आणि शेत सावकार हे गरीब जनतेचे शोषक म्हणून अण्णांना त्यांचा मनस्वी राग होता. हा राग त्यांनी लुबाडणाऱ्या सावकाराला हास्यास्पद बनवून उतरविला असल्याचे लोकनाट्यात दिसते. विनोदी पद्धतीच्या सादरीकरणामुळे हे लोकनाट्य



Scanned by CamScanner

तत्कालात खूपच प्रसिद्धी पावले होते. यातील मुख्य भूमिका खापऱ्या चोराची, जी अण्णा भाऊ स्वत: करीत असत. आणि त्यांनी साकारलेल्या विनोदी भूमिकेला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिल्याचे दाखलेही मिळतात, यावरून अण्णांचा अभिनयही दांडगा होता, हेही सिद्ध होते.

### देशभक्त घोटाळे

१९४६ साली लिहिलेले हे लोकनाट्य हे तत्कालीन काँग्रेसमध्ये काम करणाऱ्या पुढाऱ्याच्या नावावर आणि जीवनावर बेतलेले असून, 'घोटाळे' हे स्वार्थी आणि दांभिक वृत्तीचे व्यक्तिमत्त्व आहे. आपला राजकीय संपर्क वाढावा यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. आणि यासाठी कितीही ढोंगी आणि खोटे वागण्याची त्यांची तयारी दिसते. खरे तर ते आपली प्रतिमा उजळण्यासाठी ज्या ग्रामीण भागात फिरतात तिथल्या समस्यांची त्यांनी थोडीही जाण नाही. त्यातच गावातीलच पुतळा नावाची जागरूक स्त्री त्यांना विविध प्रश्न विचारून निरुत्तर करते व देशभक्त घोटाळे गावात थट्टेचा विषय बनतात.

सामाजिक जीवन जगत असताना आणि कॉम्रेड म्हणून काम करत असताना अगदी कुठल्याही राजकीय पक्षाची भीती त्यांना कधीही वाटली नाही आणि आपला विरोध त्यांनी कायम आपल्या लेखनातून व्यक्त केला. अण्णा भाऊंना जे मांडायचे ते लिहून झाले आणि त्यांना असे वाटते की जे मांडले त्यात काही बाबी मांडायच्या राहून गेल्या, तर अशा वेळी ते राहून गेलेल्या बाबी पुन्हा लोकनाट्यामध्ये आणल्याशिवाय राहत नसत. उदा. 'देशभक्त घोटाळे' या लोकनाट्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा निवडणुकीत 'घोटाळे' नावाचे लोकनाट्य लिहिले.

### निवडणुकीत घोटाळे

या लोकनाट्यामध्ये 'घोटाळे' निवडणुकीत उभे राहतात आणि निवडणुकीच्या धामधुमीत अनेक घोटाळे करतात, गबाळ्यासारखे वागतात, हास्यास्पद भाषणामध्ये बोलतात. त्यामुळे मतदार आणि गावातील पाटील यांच्या थट्टेचा विषय ठरतात. अशा अगदी विनोदी पद्धतीने त्यांनी येथे मांडणी केली असून, डाव्या जनवादी भूमिकेचा उदो उदो करून काँग्रेस कार्यकर्त्यांना सर्वांसमोर उघडे पाडणे, हा आपला उद्देश ते खुबीने साध्य करताना दिसतात.

### शेटजीचं इलेक्शन

'शेटजीचं इलेक्शन' हे भाऊंचे १९४६ साली लिहिलेले लोकनाट्य. एकीकडे देशाला नेमकेच स्वातंत्र्य प्राप्त झालेले आणि त्यानंतर लगेचच स्वतंत्र भारत देशाची लोकशाही संरचना असलेली निवडणूक होवू घातलेली; पण या निवडणुकीत कशा



Scanned by CamScanner

प्रतिनिधींना संधी मिळाली हे उपरोधकपणे त्यांनी या लोकनाट्यात मांडले आहे. त्यातच काँग्रेस हा भांडवलदार पैशेवाल्यांचा पक्ष, तर कम्युनिस्ट मात्र गोरगरीब जनतेचा पक्ष आहे, हे पटवून देण्याचे काम अण्णांनी या लोकनाट्यात केल्याचे दिसते.

निवडणूक जवळ येताच काँग्रेस कमेटीच्या ऑफिसमध्ये शेकडो अर्ज येतात. परंतु काँग्रेस अध्यक्ष सखाराम बापू पाटील त्यातील मकरचंद नावाच्या मारवाड्याच्या अर्जाची निवडीसाठी शिफारस करतात. आणि महत्त्वाचे म्हणजे हा मारवाडी स्वातंत्र्य युद्धात ब्रिटिशांना मदत करणारा, त्यांची बाजू घेणारा आहे. तो व्यापारी आहे, काळाबाजारी आहे तरीही स्वातंत्र्योत्तर पहिल्याच निवडणुकीत तो काँग्रेस पक्षाचा अधिकृत उमेदवार होतो. कारण त्याने पक्षनिधी ५०,००० रुपये कबूल केले आहेत आणि तो देईलही, ही अध्यक्ष महोदयांना खात्री आहे.

### बेकायदेशीर

'बेकायदेशीर' हे लोकनाट्य जरी १९४७ म्हणजे स्वातंत्र्यावेळी आले असले तरी झालेल्या निवडणुकीनंतरच्या परिस्थितीवर प्रकाश टाकणारे असे हे लोकनाट्य आहे. पैशाच्या जोरावर शेठ मकरचंद हे निवडून येतात. त्यांना मंत्रिपद मिळते आणि मग आपले वर्गीय हितसंबध सांभाळण्यासाठी रघुनाथमल या मिल मालकाच्या कामगारांचा संप ते कसा बेकादेशीर ठरवितात, कामगारांचा हक्क कसा डावलतात आणि याचा परिणाम म्हणून कामगार यांच्या विरोधी कसे उठाव करतात व शेवटी घाबरून कामगारांच्या मागण्या कशा मान्य केल्या जातात, या सर्व बाबींवर अतिशय मार्मिक लेखन करण्यात अण्णा भाऊ यशस्वी झाले आहेत.

### माझी मुंबई

माझी मुंबई हे लोकनाट्य म्हणजे अण्णा भाऊ यांच्या लेखनातील मानाचा तुरा आहे, असे म्हटल्यास गैर ठरणार नाही. १९४८ साली लिहिलेल्या या लोकनाट्याने अनेकांना परिवर्तनाची नांदी प्रयत्न केल्यास येऊ शकते आणि मानवाने प्रयत्न केल्यास कुठलीही बाब अशक्य नाही, याबद्दलचे प्रोत्साहन दिले. १५ जानेवारी १९४९ रोजी पोलिस कमिशनरची रीतसर परवानगी असतानाही या लोकनाट्यावर मोरारजी भाईंनी बंदीहुकूम काढला होता. मात्र, त्यांचा हुकूम झुगारून शूर कलावंतांनी कामगार मैदानावर लाखो कष्टकऱ्यांसमक्ष या लोकनाट्याच्या प्रयोगाचे सादरीकरण केले. आणि प्रेक्षकांवर अशी भुरळ घातली, की कलावंतांना पकडून न्यायला येणाऱ्या पोलिसांना जमावाने पळवून लावले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये 'माझी मुंबई' या लोकनाट्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या चळवळीमध्ये अण्णांच्या सोबत शाहीर अमर शेख, कुसुमाग्रज,

वे. वा. शिरवाडकर, ग. त्र्यं. माडखोलकर, प्र. के. अत्रे, शाहीर गवाणकर, नारायण सुर्वे, आणि प्रबोधनकार ठाकरे यांचाही समावेश होता.

'माझी मुंबई' या लोकनाट्याविषयी विचारवंत विटेकर म्हणतात, ''शेटजी आणि विष्णू यांचा झगडा असून, विष्णूचा जय म्हणजे महाराष्ट्राचा जय, असे सूत्र आहे.''

### मूक मिरवणूक

जनसामान्यांच्या मनात खदखदणाऱ्या सतत सलत जाणाऱ्या वाहत्या जखमेबद्दल 'मूक मिरवणूक' या लोकनाट्याच्या माध्यमातून अण्णा भाऊ व्यक्त होताना दिसून येतात. १९४९ साली लिहिलेल्या या लोकनाट्यात चळवळीचे नेतृत्व करू पाहणारे 'उपाशे' हे मूक मिरवणूक काढण्याचा सर्वांना सल्ला देतात. पण तरीही या मिरवणुकीतून कोणाचाच प्रश्न सुटत नाही तेव्हा जहाल विष्णू हा आपला मोर्चा पुढे घेऊन जातो व जहाल संघर्षात्मक रीतीने आपले प्रश्न मार्गी लावतो. म्हणजेच आपल्या न्याय्य हक्काच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्ष मैदानात उतरावे की उतरू नये, अशी शंका उपस्थित करून पलायनवादी भूमिका स्वीकारणारांचा, पोकळ गप्पा मारणारांचा समाचार लेखकाने घेतल्याचे लक्षात येते. सोबतच समाजवादी आणि कम्युनिस्ट यांच्या कार्यपद्धतीतील फरक स्पष्ट करण्यासाठीच भाऊंनी हे लोकनाट्य लिहिले असावे, असे लक्षात येते.

### लोकमंत्र्यांचा दौरा

१९५२ साली हे लोकनाट्य लिहिले गेले, म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस सत्तेवर आले आणि सत्तेवर आल्यानंतर त्यांची वर्तणूक कशी होती, हे दाखवण्याचा प्रयत्न या लोकनाट्यात करण्यात आला आहे. लोकनाट्यातील मकरचंद हा मारवाडी निवडून आल्यावर झोपडपट्टी आणि विविध चाळींमध्ये जाऊन लोकांना स्वच्छता ठेवण्यासंबधी, झाडे लावण्यासंबंधी उपदेश करत फिरतो. मुळात मुंबईचे झोपडपट्टीचे प्रश्न, बेघर समस्या, महागाई, काळाबाजार, भ्रष्टाचार, लाचलुचपत, बेकारी, उपासमार अनारोग्य अशा कुठल्याही प्रश्नांची समज नसणारे मंत्री दौऱ्यांमध्ये कसे भाष्य करतात, त्याचे उपहासगर्भ दर्शन या लोकनाट्यात घडते. सत्यमेव जयते, जयहिंद, कमी अन्न खा, अधिक धान्य पिकवा, शांतता पाळा, अशा प्रकारचे मकरचंद यांच्या मुखातील मुक्ताफळे काँग्रेसच्या निष्प्रभ बनलेल्या मंत्रिमंडळाचे उघडे नागडे दर्शन घडवितात.

खरे तर 'लोकमंत्र्यांचा दौरा' या लोकनाट्यातील लेखन ही आजच्याही राजकीय परिस्थितीला अगदी पूर्णतः लागू होणारी अशी आहेत, असे लक्षात येते. संधीसाधू राजकारणामुळे सामान्यांच्या समस्यांपासून दूर राहणारी आणि समस्या जाणून घेण्यासाठी बंद काचेच्या एअर कंडिशन असलेल्या गाडीच्या ताफ्यातून येणारी पुढारी मंडळी आजही आपल्याला पहायला मिळतात.

### पुढारी मिळाला

१९५२ साली पु. ल. देशपांडे यांनी 'पुढारी पाहिजे' या नावाचे लोकनाट्य लिहून राष्ट्र सेवादलाला दिले. या लोकनाट्याला उत्तर म्हणून अण्णा भाऊ यांनी 'पुढारी मिळाला' हे लोकनाट्य लिहिले होते. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचे विघटन झाले आणि त्यातून अनेक पक्ष निर्माण झाले. काँग्रेस, सेवादल, राष्ट्र सेवादल, आर. एस. एस. अशा अनेक पक्षांनी आपला प्रचार कलापथकाद्वारे सुरू केला. ही सर्व कलापथके मनोरंजनाची कामे मोठ्या खुबीने करत असत. या सर्व पार्श्वभूमीवरच आधारलेले पुढारी मिळालाचे कथानक आहे. कृष्णाकाठचा वाघिरे हा गावातील अनेक पुढाऱ्यांच्या येण्यामुळे बेचैन होतो. आणि म्हणून यावर काय उपाय शोधता येईल, याबद्दल सर्वांना एका स्टेजवर बोलावता येईल का, याचा विचार करतो व सर्वांना एकत्र आणतोही. मात्र, सर्व पुढारी मंडळींची स्टेजवरील भांडणे पाहून सर्व जनता चिडून जाते. त्यातच जांभूळवाडकर मास्तर तर वेडाच होतो व तो हरभरे खा, आम्हाला मते द्या, तुमचा विजय असो असे काहीबाही असंबद्ध बडबडत राहतो. या लोकनाट्याबाबत शाहीर अमर शेख म्हणतात, ''ते कामकऱ्यांचा नायक सत्तू शेतकरी यालाच आपला नेता मानतात. अण्णा भाऊंनी सत्तूचे केलेले वर्णन क्रांतिसिंह नाना पाटलाच्या क्रांतिकारी नि:स्वार्थी व्यक्तिमत्त्वाची आठवण करून देणारे आहे, असा या लोकनाट्याचा विनोदी आणि धीरगंभीर स्वरूपाचा विषय आहे. अण्णा भाऊंच्या लेखणीने उजळलेले ते आदर्श लोकनेत्याचे चित्र आहे.''

या लोकनाट्याकडे पाहिल्यानंतर असे वाटते की, राजकारण हा अण्णांचा अतिप्रिय असा विषय आणि समाजातील दांभिकता ही राजकारण्यांमध्ये कशी ठासून भरलेली आहे, याचे भान ते प्रेक्षकांना करून देतात. म्हणजेच केवळ मनोरंजन हा उद्देश अण्णांचा कधीच राहिलेला नाही, तर मनोरंजनासोबतच रोजच्या जीवनात येणाऱ्या समस्यांना ते रसिक प्रेक्षकांसमोर मांडत असल्याने त्यांची लोकनाट्ये लोकांना आवडत असत.

### बिलंदर बुडवे

'बिलंदर बुडवे' लोकनाट्याचा लेखनाचा कालावधी १९५७ असा असला तरी लोकनाट्याबद्दल हवी तेवढी माहिती उपलब्ध नाही. मात्र, डॉ. गुरव हे अभ्यासक 'बिलंदर बुडवे' या लोकनाट्याबद्दल लिहिताना म्हणतात, हे लोकनाट्य अण्णा भाऊंनी बुडवे आडनावाच्या एका बिलंदर माणसाच्या विलक्षण कार्यवाह्यांवर प्रकाश टाकण्यासाठी लिहिले आहे. विनोदी पद्धतीच्या साकारणामुळे ते कामगार जगतात फार मान्यता पावले. पण हे लोकनाट्य उपलब्ध नाही. मात्र, हे लोकनाट्य आज उपलब्ध असून, याची नोंद

लोकसाहित्य विचारवंत डॉ. सुदाम जाधव यांनी आपल्या 'लोकनाट्यस्वरूप' या प्रबंधात घेतलेली आहे. ते म्हणतात, "'बिलंदर बुडवे' या लोकनाट्यामध्ये अण्णा भाऊ साठे यांनी माणसाने घेतलेले कर्ज बुडवू नये. जगामध्ये ठकास महाठक भेटतात. शेरास सव्वाशेर मिळाला की माणूस योग्य मार्गावर येतो, ही शिकवण अत्यंत चांगल्या पद्धतीने विनोदी माध्यमातून मांडलेली आहे. वरील लोकनाट्यातून एकीकडे प्रेक्षकांचे मनोरंजन होते, तर दुसरीकडे त्यांच्या बुद्धीला खाद्य मिळते."

### पेंग्याचे लगीन

या लोकनाट्याचा लेखन कालावधी उपलब्ध नाही. हे लोकनाट्य अण्णा भाऊंनी कोकणामध्ये काम करणाऱ्या तिल्लोरी समाजातील कोकणी कलावंतासाठी कोकणी भाषेत लिहिलेले आहे. लग्न समारंभातील अनावश्यक खर्चावर टीका करणे हा या लोकनाट्याचा विषय आहे. एका सामान्य तरुणाचे लग्न हुंडा आणि अनावश्यक खर्च न करता साध्या पद्धतीने कसे साजरे केले जाते, यासंदर्भातील कथानक असलेले हे लोकनाट्य विनोदी अंगाने मोडणारे असे आहे. कोकणी भाषेतील विनोदी असे हे लोकनाट्य संहिता म्हणून आज मात्र कुठेच मिळत नाही.

### दुष्काळात तेरावा

या लोकनाट्याचाही लेखन कालावधी ज्ञात नसला तरी एकीकडे दुष्काळाचे वर्णन तसेच घरी येणाऱ्या पाहुण्यांनी कशी त्रेधा उडते याचे विनोदी वर्णन या लोकनाट्यात केलेले आहे. कारुण्य आणि हास्य याचा सुरेख मेळ या लोकनाट्यात पहायला मिळतो. या लोकनाट्याची संहिता आज उपलब्ध नाही; मात्र जाहिराती उपलब्ध आहेत.

### राजा संग्रामसिंह

हे लोकनाट्य अण्णा भाऊंच्या नावावर नोंदले गेले असले तरी ते शाहीर गवाणकरांचे लोकनाट्य असल्याचे अभ्यासक म्हणतात. संग्रामसिंहाचा पराक्रम अगदी वीररसपूर्ण वर्णन केला असून, विनोदाचा भाग यात फार काही मोठा नाही. शाहीर अमर शेख, गवाणकर आणि अण्णा भाऊ यांनी याचा प्रयोग सादर केला आहे. अण्णा भाऊ नाट्यलेखन करत असल्याने आपसूकच हे लोकनाट्य त्यांच्या नावावर नोंदले गेले असावे; परंतु डॉ. गुरव यांनी त्यांच्या शोधप्रबंधाच्या वेळी नामदेव कापडे यांची भेट घेऊन माहिती घेतली तेव्हा नामदेव कापडे यांनी हे लोकनाट्य गवाणकरांनी लिहिले असल्याचे सांगितले आहे. शाहीर नामदेव कापडे सध्या ठाणे महानगरपालिकेत पत्र मुद्रणाचे काम करतात ते एकेकाळी अण्णा भाऊंचे सोबती होते. आज मात्र हे लोकनाट्यही उपलब्ध नाही.

अण्णा भाऊंनी १५ वे लोकनाट्य 'कलंत्री' नावाचे असल्याची नोंद संपादक आसाराम गायकवाड यांच्या 'अण्णा भाऊ साठे' या संदर्भग्रंथात आली आहे. हे लोकनाट्य १९४६ साली लिहिले गेले असून, या लोकनाट्याचीही संहिता आज उपलब्ध नाही.

एकूणच अण्णांच्या लोकनाट्याबद्दल असे सांगता येईल की, प्रामुख्याने ही लोकनाट्ये मार्क्सवादी विचारधारेने व्यापलेली आहेत. सोबतच जीवनाच्या सर्व घडामोडींचे अंतिम ध्येय म्हणजे समाजपरिवर्तन, हे ध्येय अण्णांनी निश्चित केल्याचे दिसते. कलेसाठी कला म्हणणाऱ्या प्रस्थापितांच्या विरोधात अण्णा भाऊंचे लोकनाट्यलेखन उभे आहे. त्यामुळेच अण्णा भाऊंच्या लोकनाट्याला त्या काळचे विषय, आशय, संदर्भ व मर्यादा असल्या तरी हे विषय आजही तेवढे नवीन व आजच्या घडामोडीशी सुसंगत वाटतात.

विनोद, उपहास आणि मनोरंजन या तीन गुणांनी व्यापलेला परंपरागत तमाशा अण्णांनी उभाच्या उभा आपल्या प्रासादपूर्ण शैलीत बसवून, त्याचे लोकनाट्य बनविले. याबाबतीत डॉ. गुरव म्हणतात, ''अण्णा भाऊंनी तमाशाच्या घोड्याचे तोंड उलट्या दिशेने फिरविले, तमाशाचे लोकनाट्य असे रूपांतर केले. अण्णा भाऊंनी तमाशा परंपरेत सर्वांगाने मन्वंतर घडविले. आजच्या मराठी तमाशाच्या इतिहासात अण्णा भाऊंच्या इतका सर्वार्थाने श्रेष्ठ दर्जाचा कलावंत मराठी तमाशाला लाभला नाही, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. उमाबापूचे तमाशानिर्मितीतील अग्रस्थान, पठ्ठे बापूरावांची प्रसिद्धी, आजच्या कलावंतांनी तमाशाला मिळवून दिलेली राष्ट्रीय प्रतिष्ठा हे सारे धरूनही परंपरागत तमाशा कलेचा उद्धारकर्ता म्हणून अण्णा भाऊंचे नाव मराठी शाहिरी वाङ्मयाच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी लिहावे, एवढे मोलाचे आहे.''

**संदर्भ**


१. 'मराठीचे लोकनाट्य तमाशा कला आणि साहित्य'–नामदेव व्हटकर, यशश्री प्रकाशन.
२. 'असे होते अण्णा भाऊ साठे'–वि. ब. विटेकर, छाया प्रकाशन, पुणे.
३. 'लोकनाट्याची परंपरा'–वि. कृ. जोशी, ठोकळ प्रकाशन, पुणे.
४. 'अण्णा भाऊ साठे : समाज विचार व साहित्य विवेचन'–डॉ. बाबूराव गुरव, लोकवाङ्मयगृह, मुंबई.
५. 'लोकसाहित्य की भूमिका'–कृष्णदेव उपाध्याय, साहित्यभवन, इलाहाबाद.
६. 'माणूस कलावंत आणि समाज'–नारायण सुर्वे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
७. 'अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय'–प्रा. एम. पी. गांदेकर यांचा डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद यांना सादर केलेला शोधप्रबंध.



**डॉ. पंडित विद्यासागर**
कुलगुरू
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

शाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जीवनप्रवास हा पारंपरिक आणि आधुनिक काळाच्या सीमारेषेवर व्यतीत झाला. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पारंपरिक ज्ञान, अनुभव आणि आधुनिक विचारांचा सुरेख संगम होता. त्यातूनच त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व फुलत गेले. त्यांच्या विचारातील पारदर्शकता, सखोलता, स्पष्टता आणि संवेदनशीलता या सर्व बाबी भावून आणि भारावून टाकतात. शिक्षण कमी असूनही अंतःकरणातील ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यांनी सभोवतालच्या प्रतिकूल परिस्थितीचा वाङ्मयीन निर्मिती आणि मूल्यांवर परिणाम होऊ दिला नाही. ते आपल्या वाङ्मयीन जाणिवांशी नेहमीच प्रामाणिक राहिले. हेच शाहीर अण्णा भाऊ साठेंचे सर्वांत मोठे गुणवैशिष्ट्य मानावे लागेल. उत्तम कथाकार, कादंबरीकार, कामगारनेता आणि समाजसुधारक अशा अनेक भूमिका त्यांनी लिलया पेलल्या. 'स्मशानातील सोनं' या कथेत त्यांची गुणवैशिष्ट्ये प्रकर्षाने दिसून येतात. प्रतिकूल परिस्थितीशी झगडताना माणूस कसा असाहाय्य होत जातो याचे विदारक दर्शन त्यात घडते. महाविद्यालयीन जीव[illegible]ा 'फकिरा', 'वारणेचा वाघ' या कादंबऱ्यांनी माझे मनोविश्व व्यापून टाकले होते. [illegible]ा भाऊ साठे यांचे जीवन आणि कार्य यावर दर्जेदार ग्रंथ लिहावा अशी माझी मनोमन इच्छा होती. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या' पुढाकाराने निघणाऱ्या या ग्रंथाने ती पुरी होत आहे.

या ग्रंथासाठी मान्यवर लेखकांनी लेखन केले आहे. या लिखाणांमधून 'शाहीर अण्णा भाऊ साठे' यांच्या जीवनावर नव्याने प्रकाश पडेल आणि त्यांचे अनेक अज्ञात पैलू वाचकांसमोर येतील याबद्दल मला खात्री आहे. या ग्रंथाचे मार्गदर्शक म्हणून भूमिका निभावताना मला अतिशय समाधान लाभत आहे. डॉ. पी. विठ्ठल, डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांनी ग्रंथनिर्मितीसाठी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

मराठी साहित्य / वैचारिक
₹ 250
ISBN 978-93-86401-11-3
9 789386 401113 >
874
डायमंड पब्लिकेशन्स
info@diamondbookspune.com
www.diamondbookspune.com